महाराष्ट्र टाइम्स
ठाणे विशेष
परिसर
मुंबई ■ ८ डिसेंबर २०१५ | thane.mtonline.in




ज्ञानमंदिरे

# ना दप्तर, ना शिकवणी

कालसापेक्ष शिक्षण पद्धतीचे 'गुरुकुल'





अजित व गौरी करकरे
संस्थापक, गुरुकुल द डे स्कूल

गुरुकुल द डे स्कूल, (जीडीएस) या नावाने प्रसिद्ध असलेली डोंबिवलीतील पहिली अपारंपरिक शाळा १५ वर्षांपूर्वी स्थापन झाली. अपारंपरिक अशा अर्थाने की, फक्त अभ्यासक्रमाधारीत शिक्षण न देता खऱ्या अर्थाने सर्वांगीण विकासाचा कार्यक्रम राबविणे हा शाळेचा हेतू आहे. प्रचलित शिक्षणपद्धतीचे दोष सर्वश्रुत आहेत. परंतु शिक्षण ही सामाजिक प्रक्रिया आहे. व्यक्तिगत नाही, हा मूलमंत्र धरून कार्य करणारी बहुधा डोंबिवलीतील ही पहिली शाळा आहे. वेगाने होणाऱ्या तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे जेव्हा विशिष्ट प्रदेशाचेच नव्हे, तर संपूर्ण मानवजगताचे आर्थिक, सामाजिक व राजकीय संबंध बदलतात, तेव्हा त्याच गतीने शिक्षणपद्धतीत बदल होत राहणे आवश्यक आहे. किंबहुना, आजचा विद्यार्थी हा भविष्याचा नागरिक आहे, हे लक्षात घेऊनच सातत्याने बदलणाऱ्या भविष्यवेधी शिक्षण पद्धतीची रचना होणे आवश्यक आहे. परंतु या परिवर्तनशील समाजात बदलणारे तंत्रज्ञान, वृद्धिंगत होणारे ज्ञान, आवश्यक कौशल्य आणि समाजधार्जिणी चिरंतन सांस्कृतिक मूल्ये, यांचा योग्य समन्वय शिक्षणपद्धतीत हवा व त्याचे सतत अवलोकन हवे.

शिक्षण ही सामाजिक प्रक्रिया आहे, असे गुरुकुल गृहित धरते. कारण विद्यार्थी या समाजाचा अविभाज्य घटक आहे आणि स्थलकालपरत्वे त्याला वेगवेगळ्या सामाजिक जबाबदाऱ्या व कर्तव्ये पूर्ण करायच्या असतात.

शिक्षणाचा मूळ हेतूच उपजीविका व जीविका उत्तरोत्तर प्रगत व प्रगल्भ करत नेणे आहे. उपजीविकेसाठी तंत्रज्ञान, ज्ञान, माहिती, व्यक्तिगत व सामाजिक कौशल्ये इत्यादी असंख्य साधनांचा विकास शिक्षणातून होतोच; पण जीविका उत्तम व आनंददायी व्हावी, यासाठी चिरंतन सांस्कृतिक मूल्ये, साहित्य, कला, संगीत इत्यादींची आवड, जाण आणि विकास विद्यार्थ्यांमध्ये होणे शिक्षणात अपेक्षित आहे. शालेय शिक्षण येथेच संपत नाही, तर ही मूल्ये विद्यार्थी भविष्यातही जोपासेल व त्यांचे मन:पूर्वक पालन करेल, यासाठी संपूर्ण शालेय जीवनात त्यांचे आचरण जाणीवपूर्वक करवून घेणे, हे ही अपेक्षित आहे. गुरुकुलमध्ये प्रवेश देताना पालकांना या दृष्टीकोनाची पूर्ण कल्पना देण्यात येते आणि त्यांच्या जबाबदारीचीही जाणीव करून दिली जाते. साहजिकच विद्यार्थी- शिक्षक- पालक यांच्या समन्वयानेच या शाळेमध्ये शिक्षण होते.

विद्यार्थीदशेत संस्कार महत्त्वाचे आहेत. संस्कार कायिक, वाचिक व मानसिक असे सर्वव्यापी असतात. तसेच संस्कार ही सातत्यपूर्ण प्रक्रिया आहे. त्यामुळे विद्यार्थी शाळेत आणि घरी अशा दोन्ही ठिकाणी संस्कारित होत असतोच, पण आजुबाजूचा समाज व सामाजिक वातावरणही योग्य-अयोग्य संस्कार करत असतो. त्यामुळे योग्य संस्कारांसाठी प्रत्येक विद्यार्थी व्यक्तिशः स्वतंत्रपणे घडवावा लागतो. हे सर्व साध्य करण्यासाठी विद्यार्थी संख्या व आदर्श शिक्षक हे दोन घटक महत्त्वाचे असल्यामुळे गुरुकुलमध्ये विद्यार्थी संख्या मर्यादित आहे आणि शिक्षकांचे प्रदीर्घ प्रशिक्षण झाले आहे.

गुरुकुलचा परिसर जाणिवपूर्वक विकसित केलेला असून शिक्षणास पोषक, शहरापासून दूर, निसर्गरम्य आहे. आज शाळेत १५० विविध प्रकारच्या वनस्पती आहेत. आमच्या यशाचे गमक म्हणजे वैशिष्ट्यपूर्ण अध्यापन पद्धती. पाठयपुस्तकांची उपयुक्तता माध्यम म्हणून आहे, हे लक्षात घेतल्यामुळे संपूर्ण अध्ययन-अध्यापन परीक्षाकेंद्री न होता जीवनाभिमुख झाले आहे. साहजिकच गुरुकुलमध्ये शिक्षण शब्दश: आनंददायी आहे, याचा अनुभव आमचे पालक-विद्यार्थी यांना येतो आहे.

शाळेच्या स्थापनेपासूनच हा विचार केला आहे की, शिक्षण विद्यार्थ्यांसाठी जितके तणावमुक्त हवे, तितकेच पालकांसाठीही हवे. त्यामुळे शाळा आठ तासांची आहे. आज दप्तराचे ओझे कमी करण्याची चर्चा व प्रयत्न सुरु आहेत; पण 'गुरुकुल द डे स्कूल' गेली १५ वर्षे विनादप्तर-विनाशिकवणी चालू आहे. अगदी गृहपाठही सहावीपर्यंत फक्त अपवादानेच दिला जातो. शाळेच्या या उपक्रमाच्या यशाची पावती दहावीच्या विद्यार्थ्यांनी भरघोस यश मिळवून दरवर्षी दिली आहे. शाळा पालकांना वेळोवेळी योग्य मार्गदर्शन करीत असते. त्यामुळे पालकांचाही या यशात महत्त्वाचा वाटा आहे.

गुरुकुल आता केंब्रिज आयजीसीएसई अभ्यासक्रमास संलग्न झाले आहे. पुढील वर्षी ज्युनिअर कॉलेज सुरू होत आहे.

**स्वयंशिस्त** - जिज्ञासू वृत्तीची जोपासना सामाजिक जबाबदारीचे भान आणि शैक्षणिक मेहनत या भक्कम पायावर 'गुरुकुल द डे स्कूल'च्या आजी व माजी विद्यार्थ्यांची जीवनाच्या सर्व क्षेत्रात यशस्वी वाटचाल चालू आहे.